follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २६ अंक ३४० मंगळवार दि.१० सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत ५/-



# आज गौरींचे घरोघरी उत्साहात होणार आगमन

**ज्येष्ठा गौरी आवाहनाच्या दिनी गौराई तुमच्या घरात सुख, समृद्धी, आनंद आणि भरभराट घेऊन येऊ दे ही सदिच्छा!**

**गौरी आवाहनाच्या शुभेच्छा!**

# अजित पवार निवडणूक लढवणारच

## छगन भुजबळ यांची ग्वाही



**नाशिक :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे मध्येच शस्त्र खाली टाकून बाजूला होणाऱ्यांपैकी नेते नाहीत. ते निश्चितपणे विधानसभा निवडणूक लढविणारच, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

नुकतेच बारामती येथे केलेल्या भाषणात अजित पवार यांनी यापुढे बारामतीतून निवडणूक लढविणार नसल्याचे वक्तव्य केले होते. त्यामुळे केवळ बारामतीच्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ माजली. मात्र, अजितदादा निवडणूक लढविणारच, असे भुजबळ यांनी ठामपणे सांगितले.

बारामतीकरांसाठी मोठ्या प्रमाणावर विकासकामे सातत्याने केली असतानाही बारामती लोकसभा मतदारसंघातून सुनेत्रा पवार यांचा पराभव झाल्याची खंत अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. मात्र, त्यामुळे ते निवडणूक लढवणार नाहीत असे होऊ शकत नाही, असा दावा भुजबळ यांनी केला.

अजितदादांचे वय हा निवडणूक न लढविण्यासाठी चा मुद्दा होऊ शकत नाही. ते आमचे कप्तान आहेत. माझे वय ७८ वर्ष असले तरीही ते मला निवडणूक लढवण्यास सांगतात. मग ते स्वतः निवडणूक लढवणार नाहीत असे कसे शक्य आहे, असा सवालही भुजबळ यांनी केला.

देशाचे गृहमंत्री आणि भाजपचे निवडणूक रणनीतीकार अमित शहा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना घटक पक्षातील नेत्यांना परस्परांवर टीका करण्यापासून थांबवण्याची सूचना केली आहे. ही सूचना योग्यच आहे. एकत्रितपणे लढून विजय संपादन करण्याचे उद्दिष्ट गाठणे आवश्यक आहे. महायुतीतील तिन्ही घटक पक्षांना चांगली कामगिरी करायची असेल तर एकमेकांच्या विरोधात बोलू नका आणि विरोधकांना चघळायला खाद्य देऊ नका, असे आवाहन भुजबळ यांनी केले. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी ही भूमिका मान्य केली असल्याचेही ते म्हणाले.

काही शासकीय योजनांचे पैसे लाभार्थींना वेळेत मिळत नसल्याच्या विरोधकांच्या आरोपाकडे लक्ष वेधले असत भुजबळ म्हणाले की, शासकीय योजनांचे पैसे मिळण्यास काही प्रमाणात वेळ पुढे मगे होणे स्वाभाविक असते. शासकीय तिजोरीत ज्या प्रमाणात निधी जमा होतो त्या प्रमाणात प्राधान्यक्रमाने त्याचे वितरण केले जाते. काही वेळा अन्य तातडीच्या कारणांसाठी निधी वर्ग करण्याची आवश्यकता भासल्यामुळे शासकीय योजनांचे पैसे जमा होण्यास उशीर होऊ शकतो. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार असताना तर शासकीय योजनांचे पैसे लाभार्थींकडे पोहोचण्यास दोन ते तीन वर्षाचा कालावधीही लागला असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ही मनाला झालेली खूप खोलवर जखम आहे; कृषिमंत्री धनंजय मुंडे

**बीड :** यंदा झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र राज्यात महायुतीला मोठा फटका सहन करावा लागला. महाविकास आघाडीने सर्वात जास्त जागा लोकसभेला जिंकल्या. महायुतीच्या पराभवामागे मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा परिणाम असल्याचे म्हटले जाते. दरम्यान, याचा फटका बीडमध्ये महायुतीच्या भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना देखील बसला. याबाबत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी भाष्य केले आहे.

धनंजय मुंडे बीड विधानसभा मतदारसंघातील एका आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी ते म्हणाले, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत केवळ सहा हजार मतांनी आमची इज्जत गेली. ही मनाला खूप खोलवर झालेली जखम आहे. ती अद्याप भरून निघालेली नाही. धनंजय मुंडे बीड मधील एका अल्पसंख्यांक मेळाव्यात बोलत होते. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मौलाना महामंडळासाठी दीड हजार कोटी रुपयांची मागणी केली होती.

## भाजपचे ५० टक्के उमेदवार निश्चित

**मुंबई :** राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आणि गणेशोत्सवानिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नुकताच मुंबई दौरा केला. या दौऱ्यादरम्यान, अमित शाहांनी भाजपच्या नेत्यांशी आगामी निवडणुकांसदर्भात सखोल चर्चा केली. रविवारी रात्री सह्याद्री अतिथीगृहावर झालेली बैठक रात्री उशिरापर्यंत सरू होती. यावेळी राज्यातील विधानसभा निवडणकीच्या अनुषंगाने काही महत्त्वाच्या विषयांवर सखोर चर्चा करण्यात आली. एका इंग्रजी वृत्तवाहिनीने यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध केले आहे.



लोकसभा निवडणुकीदरम्यान झालेल्या चुका सुधारून भाजपने विधानसभेसाठी उमेदवार निश्चित केले आहेत.विशेष म्हणजे विधानसभा निवडणुकीसाठी भाजपचे ५० टक्के उमेदवार निश्चित झाले आहेत. पण भाजपने निश्चित केलेल्या या उमेदवारांना दसऱ्यानंतर फोनवरून कळवले जाईल. अशी माहिती माहिती भाजपच्या सुत्रांनी दिली आहे.

याशिवाय या बैठकीदरम्यान भाजप नेत्यांनी अमित शाहांसमोर एक प्रस्तावही मांडला. या प्रस्तावानुसार,येत्या विधानसभा निवडणुकीत २५ जागांसाठी महायुतीतील तीनही पक्षांमध्ये तिढा आहे. यात इंदापूर, अमरावतीसह काही जागांचा समावेश आहे. वाद किंवा मतभेद वाढू नयेत,यासाठी अशा जागांवर मैत्रीपूर्ण लढत व्हावी, असा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. पण यावर शिंदे गट आणि अजित पवार गट काय भूमिका घेणार, हे पाहणे देखील महत्त्वाचे ठरणार आहे.

यासोबतच येत्या काही दिवसात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत दिल्लीत अमित शाहांसोबत आणखी एक बैठक होण्याची शक्यता आहे. त्याबरोबर अमित शहांनी भाजप नेत्यांना ओबीसी समाजावरही लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला दिला आहे.

## चंद्रशेखर बावनकुळेंच्या मुलाच्या ऑडीची दोन वाहनांना धडक; दोघांना अटक

**मुंबई :** ऑडी चालवणारे दोघेजण धरमपेठेतील एका बिअर बारमधून परतत असताना ही घटना घडली. मात्र, त्यापैकी कोणी मद्यधुंद अवस्थेत होते की नाही, याची माहिती पोलिसांनी दिलेली नाही. जितेंद्र सोनकांबळे यांच्या फिर्यादीवरून बेदरकारपणे वाहन चालवणे आणि अपघाता प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे यांच्या ऑडी कारने नागपुरात अनेक वाहनांना धडक दिली. यात दोनजण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी चालकासह दोघांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी जितेंद्र सोनकांबळे यांनी तक्रारदिली आहे. जितेंद्र सोनकांबळेंच्या कार आणिएका मोपेडला संकेत बावनकुळेंच्या ऑडीची धडक बसली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना नागपुरातील रामदासपेठ परिसरात घडली आहे. सीताबर्डी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संकेत बावनकुळे यांच्या ऑडीनेजितेंद्र सोनकांबळे यांच्या कारला धडक दिली. त्यानंतर मोपेडला धडक दिली. त्यात प्रवास करणारे दोघे जखमी झाले. यानंतर मानकापूर परिसरातहही ऑडीने आणखी काही वाहनांना धडक दिली. तेथील एका टी-पॉइंटवर ऑडीने पोलो कारला धडक दिली. त्यातील लोकांनी ऑडीचा पाठलाग करून मानकापूर पुलाजवळ अडवली. यात संकेत बावनकुळे याच्यासह तिघे पळून गेल्याच त्यांनी सांगितले.

ऑडी चालक अर्जुन हावरे आणि रोनित चित्तमवार यांना पोलो कारमधून प्रवास करणाऱ्या लोकांनी अडवले. त्याला तहसील पोलिस ठाण्यात नेण्यात आले. यानंतर पुढील तपासासाठी त्याला सीताबर्डी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ऑडी चालवणारे दोघेजण धरमपेठेतील एका बिअर बारमधून परतत असताना ही घटना घडली. मात्र, त्यापैकी कोणी मद्यधुंद अवस्थेत होते की नाही, याची माहिती पोलिसांनी दिलेली नाही.

## गडचिरोलीमध्ये पावसाचा अक्षरशः कहर

### पर्लकोटा नदीला पूर, अनेक गावांचा संपर्क तुटला

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यामध्ये पावसाने कहर केला आहे. रविवारपासून पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे गडचिरोलीतील पर्लकोटा नदीला पूर आला. या पुरामुळे तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. पुराचे पाणी अनेक गावांमध्ये शिरले असून, त्यामुळे भामरागडमधील घरे दुकाने आणि शेती पाण्याखाली गेली आहे. या पुरामुळे गडचिरोलीतील जनजीवन विस्कळीत झाले.



मिळालेल्या माहितीनुसार, गडचिरोली जिल्ह्यातील अनेक भागात रविवारी सायंकाळपासून जोरदार पाऊस पडत आहे. पावसामुळे भामरागड लगतच्या पर्लकोटा नदीला पूर आला आहे. पुराचे पाणी शहरात शिरले असून, येथील शंभरहून अधिक घरे, दुकाने पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे संसार उपयोगी साहित्य आणि दुकानांमधील सामानांची मोठी नासधूस झाली. या पुरामुळे व्यावसायिकांचे मोठे नुकसान झाले.

पुराच्या पाण्याचा गावांना वेढा

मुसळधार पावसामुळे पर्लकोटा नदीला आलेल्या पूराचे पाणी सोमवारी सकाळी शहरामध्ये शिरले. त्यामुळे नागरिकांची एकच तारांबळ उडाली. या पुरामुळे भामरागड तालुक्यातील १२० गावांचा संपर्क तुटला. पुराच्या पाण्याने अनेक गावांना वेढा घातला. या पुरामुळे नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. पुराची स्थिती लक्षात घेता नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पस्तीस किलो साबुदाण्यापासून गणपतीची रांगोळी

**मुंबई :** मुलुंड मधील प्रसिध्द गणेश मूर्तीकार मोहनकुमार दोडेचा यांनी यावर्षी देखील पस्तीस किलो साबुदाण्यापासून गणपतीची रांगोळी साकारली आहे.

पाच फूट रुंद आणि सहा फूट लांब अशी ही रांगोळी असून १४ सप्टेंबरपासून ती नागरिकांना पाहता येणार आहे.दोडेचा यांनी १९६१ पासून आशा प्रकारच्या रांगोळ्या तयार करण्यास सुरुवात केली. त्यांनी तयार केलेली रांगोळी पाहण्यासाठी दरवर्षी हजारोंच्या संख्येने नागरिक येतात.







सातारा गणेश दर्शन (छाया : अतुल देशपांडे )

# निर्भया, अभया, अपराजिता आणि

ममता बॅनर्जी यांचे आडमुठे राजकारण जगजाहीर आहे. संयम, सहिष्णुता, उदारमतवाद आदी गुणांचा आणि ममतादीदींचा फारसा ऋणानुबंध नाही. काही आठवड्यांपूर्वी पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथील रुग्णालयातील महिला डॉक्टरवर झालेला लैंगिक अत्याचार, तिची हत्या आणि नंतर त्या प्रकरणाची हाताळणी या मुद्द्यांवर दीदींविषयी बरे बोलावे असे काही नाही. त्याबाबत राष्ट्रीय पातळीवर क्षोभ निर्माण झाला आणि ते रास्तच होते. या प्रकरणात पुरती नाचक्की झाल्यानंतर दीदींनी महिलांवरील अत्याचार कसे रोखावेत यावर चर्चा करणारी दोन पत्रे पंतप्रधानांस लिहिली. ते वरातीमागून घोडे हाकण्यासारखे होते. राज्याच्या मुख्यमंत्री या नात्याने स्वत: जे काही करणे अपेक्षित आहे ते करावयाचे नाही, त्याबाबतच्या सल्लासूचनांबाबत हट्टीपणा करायचा आणि नंतर फारच आरडाओरड झाल्यावर इतरांच्या नावे बोटे मोडायची असे त्यांनी अनेकदा केलेले आहे. या वेळी त्याचा जास्त बभ्रा झाला. कारण प्रश्न महिलांची इभ्रत, इज्जत आणि महिला मुख्यमंत्र्याचे इमान या मुद्द्यांचा होता. इतके करूनही हे प्रकरण शांत होत नाही हे पाहिल्यावर त्यांच्या सरकारने महिलांवरील अत्याचार यापुढे कसे हाताळले जातील याबाबत नवा 'कायदा' केला. त्याची दखल घेणे आवश्यक. याची प्रमुख कारणे तीन. राजकीय, वैधानिक आणि असे अन्य कायदे. प्रथम राजकीय मुद्द्याविषयी.

कारण या विधेयकास विधानसभेत खुद्द भाजपनेच 'शत-प्रतिशत' पाठिंबा दिला. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि त्यांचे एकेकाळचे सहकारी आणि विद्यमान भाजप-नेते सुवेंदु अधिकारी यांच्यातून विस्तव जात नाही. पण विधानसभेत या कायद्याचा प्रस्ताव आला तेव्हा अधिकारीबाबूंनी त्याचे स्वागत केले आणि या कायद्याची गरज कशी आहे हे ते सांगू लागले. यातील वादी-संवादी मुद्दा ममता आणि सुवेंदुबाबू यांच्या भाषणातील. ममता यांनी आपल्या या संदर्भातील भाषणात थेट पंतप्रधानांवर कडाडून हल्ला केला आणि देशातील महिलांच्या रक्षणार्थ ते कसे अपयशी ठरले याचा लांबलचक पाढा वाचला. दुसरीकडे सुवेंदुबाबूंनी हेच मुद्दे ममतादीदींबाबत मांडले. त्यांच्या मते दीदींनी राजीनामा देण्याची गरज आहे. म्हणजे ममतांना पंतप्रधानांचा राजीनामा हवा आणि सुवेंदुंना ममताबाईंचा. पण ममताबाईंचा राजीनामा हवा असेल तर त्यांनी मांडलेल्या विधेयकास एकमुखी पाठिंबा, हे कसे? या प्रश्नाचे उत्तर ममताबाईंनी राज्य भाजपसमोर निर्माण केलेल्या पेचात आहे. या विधेयकास विरोध केला तर आपण महिला-संरक्षण-विरोधी दिसण्याचा धोका आहे, हे लक्षात आल्याने राज्य भाजपस ममताबाईंच्या प्रयत्नांची तळी उचलून धरण्याखेरीज पर्याय राहिला नाही. पण राज्य भाजपच्या या अपरिहार्यतेमुळे आणखी दोघांची अडचण होणार. राज्यपाल आणि राष्ट्रपती. पश्चिम बंगालच्या राज्यपालांना या कायद्यास मान्यता देणे लांबवता येते का, हे आता पाहावे लागेल. एरवी भाजपेतर राज्यांचे राज्यपाल विधेयके महिनोनमहिने अडवून ठेवतात. आता ते या विधेयकाबाबतही तसेच करणार काय? शिवाय राज्यपालांनी या विधेयकास मंजुरी दिल्यावर प्रश्न राष्ट्रपतींचा. अन्य अनेक भाजपेतर राज्यांची विधेयके राष्ट्रपती भवनात धूळ खात आहेत. आता राष्ट्रपती भवनातील महामहिमा द्रौपदी मुर्मू या विधेयकाबाबतची दिरंगाई टाळणार का? टाळली तरी टीका आणि न टाळावी तरी टीका, अशी ही अडचण.

दुसरा मुद्दा या कायद्यातील तरतुदींचा. पश्चिम बंगालचे शहाणपण असे की नुसत्या बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपींस ते फाशीची शिक्षा सुचवत नाही. बलात्कार आणि नंतर हत्या असे गुन्ह्याचे स्वरूप असेल तर हे विधेयक आरोपीस फाशीची शिक्षा सुचवते. केवळ बलात्काऱ्यांस आजन्म कारावास या कायद्यात प्रस्तावित आहे. हे योग्य अशासाठी की बलात्कारासही फाशीची शिक्षा ठोठावली जाऊ लागली तर आरोपी बलात्कारित अभागीस जिवंत न ठेवण्याची शक्यता अधिक. तसे होऊ लागल्यास बलात्काराचा गुन्हा सिद्ध होण्यात अधिक अडचणी येतील आणि त्यामुळे आरोपींवरील गुन्हा सिद्ध करणे अधिक आव्हानात्मक होईल. तेव्हा बलात्काऱ्यांस फाशी हवी असा आक्रोश अलीकडे वाढू लागला असला तरी त्यात वैधानिक शहाणपण नाही. तृणमूल सरकारच्या या प्रस्तावित कायद्यात हे शहाणपण दिसते. यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे तो बलात्काराचा गुन्हा नोंदला गेल्यानंतर २१ दिवसांत त्याचा तपास पूर्ण करण्याची हमी. यात जास्तीत जास्त १५ दिवसांची मुदतवाढ होऊ शकते. तसेच अशी प्रकरणे किमान पोलीस अधीक्षक वा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनच हाताळली जातील, असे हा कायदा म्हणतो. तथापि यानंतर ३० दिवसांत न्यायिक प्रक्रिया पूर्ण करण्याची हमी हा प्रस्तावित कायदा देतो, ते कसे? सरकार स्वत: काय करू शकते यास बांधील राहील हे ठीक. पण न्यायालयास असे काही बंधन सरकार घालू शकते काय? तसे ते घालण्यासाठी बलात्कार, लैंगिक अत्याचारांची सर्व प्रकरणे जलदगती निकाली काढली जावीत यासाठी राष्ट्रीय स्तरावर कायदा व्हायला हवा. एकट्या पश्चिम बंगालचाच अपवाद त्यास कसा काय करणार? ममताबाई याचे उत्तर देण्याच्या फंदात काही पडलेल्या नाहीत. आता तिसरा मुद्दा.

तो म्हणजे अशाच प्रकारच्या अन्य राज्यांनी केलेल्या कायद्याचा. दक्षिणी आंध्र प्रदेशने याच विषयावर २०१९ साली 'आंध्र प्रदेश दिशा विधेयक' मंजूर केले. मुंबईतील शक्ती मिल परिसरात घडलेल्या अशाच घृणास्पद गुन्ह्यानंतर महाराष्ट्र सरकारनेही अशा स्वरूपाचे विधेयक आणले. ही घटना २०२१ सालची. 'शक्ती कायदा' असेच त्याचे नाव. आंध्र प्रदेशचा कायदा बलात्काऱ्यास फाशीची शिक्षा सुचवतो. सामूहिक बलात्कारातील सर्व आरोपींसही फासावर लटकवायला हवे, अशीही मागणी या कायद्यात आहे. पश्चिम बंगालप्रमाणे हा कायदाही लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांचा तपास २१ दिवसांत संपवण्याची हमी देतो. या संदर्भातील जनभावनेची कदर करत महाराष्ट्राचा कायदाही बलात्कार आणि नंतर हत्या करणाऱ्या बलात्काऱ्यांच्या फाशीची मागणी करतो. तथापि हा कायदा अन्य राज्यांपेक्षा अधिक व्यापक आहे. त्यात महिलांवरील ॲसिड हल्ले आदींचाही विचार करण्यात आला असून त्यातील आरोपींसही कडक शासन महाराष्ट्र सुचवतो. तसेच अशा गुन्ह्यांचा तपास ३० दिवसांत पूर्ण करण्याचे बंधन महाराष्ट्र स्वत:वर घालून घेतो. अन्य राज्ये काय करू इच्छितात याचा तपशील देण्याचे कारण म्हणजे यातील एकाही विधेयकाचे रूपांतर कायद्यात झालेले नाही, हे सांगणे. नुसतीच चर्चा. राज्य पातळीवर ती पार पडून विधेयके राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवल्यावर आधी ती राजभवनात उबवली जातात. आणि नंतर राष्ट्रपती भवनात. ना आंध्रचा कायदा झाला ना महाराष्ट्राचा. आपले राज्यपाल आणि राष्ट्रपती केवढे कामाचे डोंगर उपसतात! त्यामुळे त्यांना या किरकोळ विषयासाठी वेळ काढणे अंमळ अवघड जात असावे. या पार्श्वभूमीवर भाजपनेही पाठिंबा दिल्याने पश्चिम बंगालच्या विधेयकास सर्व मंजुऱ्या देणे राज्यपाल, राष्ट्रपती यांस शक्य होईल काय? तसे झाल्यास याच राज्याचा का अपवाद हा प्रश्न. आणि नाही दिली तर ममतादीदी राज्यपाल, राष्ट्रपती आणि भाजप यांविरोधात बोंब सिद्धीस नेण्यास समर्थ आहेतच.

म्हणजे नुसती बोंब हेच या सगळ्याचे तात्पर्य. या अशा भयानक गुन्ह्यांत बळी ठरलेल्या अभागी महिलांस निर्भया, अभया आणि आता पश्चिम बंगालचे अपराजिता असे उदात्त नामकरण करायचे. पण प्रत्यक्ष कृती शून्य. असे आणखी काही नामकरण करण्याची संधी (?) मिळायच्या आधी तरी हे वा असे कायदे प्रत्यक्षात यावेत. अन्यथा नुसती फुकाची शब्दसेवा आहेच.

## साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीरच्या देखाव्यात १८ संतांच्या पादुकांचे दर्शन

**पुनीत बालन यांच्या हस्ते उदघाटन**

**पुणे :** साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीरच्या सार्वजनिक गणेशोत्सवात १८ संतांच्या पादुका दर्शन सोहळा हा देखावा करण्यात आला आहे. तसेच श्री सद्गुरू शंकर महाराज मठाची प्रतिकृति उभारण्यात आली आहे.या प्रतिकृतीचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक पुनित बालन यांच्या हस्ते सोमवार,दि.९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता उत्साहात झाले. रवींद्र माळवदकर (अध्यक्ष, साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीर),भाई कात्रे (कार्याध्यक्ष,साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीर),शिवानी माळवदकर,विजय गोरे,नितीन काळे,योगेश निंबाळकर,आनंद साळुंखे,धनंजय काळे हे मान्यवर उपस्थित होते.



संत ज्ञानेश्वर,मुक्ताबाई,नामदेव, जनाबाई,नरहरी सोनार,सेनामहाराज, निळोबाराय,रामदास,वेणाबाई,महाव तार,स्वामी समर्थ,टेम्बे स्वामी,शंकर महाराज,गुळवणी महाराज यांच्या पादुकांच्या प्रतिकृती मांडण्यात आल्या आहेत. दि.९ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत दररोज एक संत याप्रमाणे श्री साईबाबा,जंगली महाराज,अक्कलकोट स्वामी समर्थ,माळी महाराज,गजानन महाराज तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूळ पादुका देखील दर्शनासाठी मांडण्यात येत आहेत.१९१९ साली स्थापन झालेल्या साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीरला १०५ वर्षांची परंपरा आहे.राष्ट्रीय एकात्मता प्रसारासाठी ही संस्था प्रयत्न करते.

पुनीत बालन म्हणाले,'चांगले सामाजिक कार्य गणेश मंडळाच्या मार्फत होऊ शकते याचे प्रत्यंतर साखळीपीर तालीम राष्ट्रीय मारूती मंदीर गणेशोत्सव मंडळाने दाखवून दिले आहे. गणेश मंडळाचे कार्यकर्तेच समाजाच्या अडचणीत धावून येतात,हे आपण नेहमी पाहत असतो. आजच्या भेटीच्या निमित्ताने या मंडळाचा सामाजिक पुढाकाराची माहिती मिळाली . आम्ही नेहमी त्यात योगदान देऊ. रवींद्र माळवदकर हे गणेशोत्सवात नेहमी मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावतात.ते प्रत्येक बैठकीत कार्यकर्ते,मंडळे आणि प्रशासनाला उपयुक्त सूचना करतात. त्यांचा अनुभव उत्सव पुढे नेण्यास उपयुक्त ठरेल.'

## देशभर ७०० कोटी वृक्ष लावण्याचा पर्यावरण संकल्प

**मुंबई :** पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयाने ५ वृक्ष जर लावले तर ७०० कोटी वृक्ष लागवड होऊ शकते. त्यामुळे या पर्यावरणीय जनजागृतीसाठी इको फ्रेंडली लाईफ या सामाजिक संस्थेने देशभर वृक्ष लागवड संकल्प केला असून स्वतः २६ हजार ७०० वृक्ष महाराष्ट्र व गोवा या राज्यात लाऊन पर्यावरण वाचविण्याचा संकल्प केला आहे. अशी माहिती पर्यावरण बचाओ आंदोलनाचे प्रणेते व इको फ्रेंडली लाईफ चे संस्थापक अध्यक्ष अशोक एन. जे. यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना अशोक एन जे म्हणाले, भारतात तरुण वर्ग जास्त प्रमाणात आहे. त्यांना सोबत घेत हि जनजागृती सुरू आहे. बेरोजगारी, गुन्हेगारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि फसवणूक अशा अनेक समस्यांमध्ये खितपत पडलेल्या समाजाला बाहेर काढायचे असेल तर तरुणांच्या



हाती पर्यावरण रक्षणाची जवाबदारी दिली पाहिजे असे अशोक त्यांनी सांगितले.

७०० कोटी झाडे लावण्याचा महासंकल्पामध्ये तरूण वर्ग सहभाग घेत आहे. त्यांनी घेतलेला पर्यावरण रक्षणाचा वसा इतर तरूणांनीही घ्यावा म्हणून हा पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी हे पर्यावरण जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे.

## उत्सव मित्र मंडळाची पूरग्रस्तांना मदत



### जिवंत देखाव्यातून पुण्याचा वारसा जपण्याचे आवाहन

**पुणे :** उत्सव मित्र मंडळ(गांजवे चौक,नवी पेठ) तर्फे एकतानगर (सिंहगड रस्ता) येथे पुरामुळे घराचे नुकसान झालेल्या पांडुरंग त्रिंबक मानवदकर यांना आर्थिक मदत म्हणून २५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला.रविवारी सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अभय छाजेड,ज्येष्ठ पत्रकार संभाजी पाटील,उद्यम विकास सहकारी बँकचे संचालक दिनेश भिलारे,शिवसेना पुणे शहर प्रसिद्धीप्रमुख अनंत घरत यांच्या उपस्थितीत हा धनादेश देण्यात आला.या प्रसंगी मंडळाचे कार्याध्यक्ष सुधीर काळे,अध्यक्ष अतुल धर्मे,सचिन गायकवाड,विनय कदम,सुमित काळे,विजय लोणकर,तुषार सस्ते,सुनिल वाबळे,धनंजय लोणकर,प्रतीक काळे,बाळासाहेब कांबळे,शैलेश कदम,अनिल तापकीर, आकाश खराटे आदि पदाधिकारी उपस्थित होते.

यावर्षी मंडळाने 'वारसा पुण्याचा,पुन्हा जपुया' हा जिवंत देखावा सादर केला आहे. विद्येचे माहेरघर ते ट्रॅफिकचे शहर,गुन्हेगारी-व्यसनांचे आगर अशी पुण्याची बदललेली ओळख ही व्यथा या जिवंत देखाव्यात मांडली आहे.जुन्या पुण्याचा ंस्कृतिक,शैक्षणिक,सामाजिक ओळख पुन्हा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन या देखाव्यातून करण्यात आले आहे. जिवंत देखाव्याची संकल्पना संतोष शिकरे यांची आहे.उत्सव मित्र मंडळची स्थापना १९७२ साली झाली असून मंडळ दरवर्षी विसर्जन मिरवणुकीचा खर्च टाळून हा निधी विविध सामाजिक उपक्रमांवर खर्च करत असते,असे मंडळाचे कार्याध्यक्ष सुधीर काळे यांनी सांगितले.

## अधिकारीच झाले ठेकेदारांचे दलाल, दौंडमधील धक्कादायक प्रकार

**दौंड :** दौंड तालुक्यातील पांढरेवाडी गावातील मुख्य रस्त्याची दुरावस्था झालीय, परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मात्र मूग गिळून गप्प बसले आहेत. पांढरेवाडी गावातील मुख्य रस्त्यावर निंबाळकर वस्ती ते ग्रामपंचायत हद्दी पर्यंत संबंधित ठेकेदाराने रस्ता खोदून त्यावर काही ठिकाणी मुरूम टाकला आहे परंतु सध्या काही दिवसांपासून पावसाच्या हलक्या सरी होत असल्याने मुरूम टाकलेल्या ठिकाणी पूर्ण चिखल होत आहे. या ठिकाणाहून शाळकरी विद्यार्थी, सायकल वरून प्रवास करत असताना अनेक वेळा सायकल घसरून पडलेले आहेत तर काही प्रवाश्यांची दुचाकी देखील घसरून पडलेले आहेत.

पांढरेवाडी गावातील निंबाळकर वस्ती जवळील वनविभाग हद्द ते जाधववस्ती शाळा व पाटस बारामती



महामार्ग असे दोन टप्पे व पांढरेवाडी वनविभाग ते भागवत वस्ती कुरकुंभ शिव पर्यंत असा एक टप्पा आशा या तिन्ही टप्प्यांचा कामासाठी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंतर्गत करोडो रुपये निधी आलाय परंतु संबंधित ठेकेदार हे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करत असल्याचे नागरिकांमधून बोलले जाते.

या रस्त्याचे काम निकृष्ट करून संबंधित ठेकेदार व संबंधित विभागाचे अधिकारी मलई खातात असं देखील नागरिक व प्रवाश्यांमधून बोललं जातंय.

पांढरेवाडी कुरकुंभ शिव ते हिंगणिगाडा रस्ता असा दोन ते तीन टप्प्यात निधी आला असल्याचं संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून बोललं जातंय मंग कुरकुंभ गाव ते पांढरेवाडी ग्रामपंचायत शिव देखील रस्त्याला खड्डे पडलेत परंतु निधी नसल्याने संबंधित रस्ता होऊ शकत नाही निधी आल्यावर उर्वरित रस्ता होणार असं देखील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

पांढरेवाडी गाव हे रस्त्याच्या बाबतीत अनेक वर्षांपासून वंचित आहे. रस्ता होतो परंतु रस्ता करताना काम निकृष्ट दर्जाचे केल्याने काही महिने काही दिवस उलटताच या रस्त्याची चाळण होण्यास चालू होते. कुरकुंभ गाव ते पालखी महामार्ग पाटस बारामती रोड पर्यंत साधारणतः पाच ते सहा किलोमीटर चा रस्ता आहे परंतु या रस्त्यात अनेक वर्षांपासून थोडा दोन किलोमीटर रास्ता होतो तेथून पुढचा रस्ता काही महिन्यांनी किंवा वर्षांनी होतो तो पर्यंत झालेला रस्ता हा खराब होतो अनेक वर्षांपासून हा पांढरेवाडी गावातील मुख्य रस्ता चांगला व टिकाउदार व्हावे अशी मागणी नागरिक करत आहे .

परंतु ज्या विभागाकडून रास्त मंजूर होतो तो विभाग या रस्त्याचे काम त्यांच्या जवळच्या ठेकेदाराला मिळते. मंग त्या रस्त्याचे वाटोळे झाले तरी चालेल परंतु संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना मलई मिळाली पाहिजे अशी चर्चा गावातील नागरिक, प्रवाशी करत आहे. कुरकुंभ येथे औद्योगिक वसाहत असल्याने येथे कामगार वर्ग तसेच गावात शाळा महाविद्यालय व रुग्णालय तसेच विविध शासकीय कामासाठी या एकमेव रस्त्याचा वापर करावा लागतो. त्यामुळे या रस्त्याचे काम चांगले व्हावे अशी मांगणी येथील ग्रामस्थ व प्रवाशी करत आहे.

## कुस्तीगीर बजरंग पुनिया याला काँग्रेस न सोडल्यास जीवे मारण्याची धमकी

**सोनपत :** कुस्तीच्या रिंगणातून बाहेर पडून राजकारणाच्या आखाड्यात उतरलेल्या बजरंग पुनिया याला काँग्रेस न सोडल्यास जीवे मारण्याची धमकी परदेशातील दूरध्वनीवरून देण्यात आली आहे. राजकारणापासून दूर न राहिल्यास तुझ्या कुटुंबाचेही काही खरे नाही, असेही धमकी देणाऱ्याने म्हटले आहे.

तांत्रिक कारणाने ऑलिंपिक पदक गमवावे लागलेली महिला कुस्तीगीर विनेश फोगट आणि ऑलिंपिक कुस्तीगीर बजरंग



पुनिया यांनी नुकताच काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. काँग्रेसने विनेशला हरियाणातून विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दिली आहे तर बजरंग पुनिया याला किसान काँग्रेसचे कार्याध्यक्षपद देण्यात आले आहे.

भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष आणि भारतीय जनता पक्षाचे खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्याकडून महिला कुस्तीगीरांचे शोषण होत असल्याचा आरोप करून विनेश आणि काही महिला कुस्तीगीरांनी आंदोलन केले होते. त्यांच्या आंदोलनाला बजरंग ची साथ होती. त्यावेळी हे आंदोलन काँग्रेस पुरस्कृत असल्याचा आरोप ब्रिजभूषण यांनी केला होता.

विनेश आणि बजरंगने काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतरही ब्रिजभूषण यांनी त्यांच्यावर टीका केली. विनेशने इतरांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केल्यामुळेच तिचे ऑलिम्पिक पदक हुकले, असे विधान त्यांनी नुकतेच केले आहे.

हरियाणा विधानसभा निवडणूक तोंडावर असताना ब्रिजभूषण यांच्या वक्तव्यांमुळे पक्ष अडचणीत येण्याची शक्यता लक्षात घेऊन भाजप नेतृत्वाने ब्रिजभूषण यांना माध्यमांद्वारे जाहीर वक्तव्य करण्यास मनाई केली आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सुधाकर गुरव व सौ.अश्विनी कुलकर्णी शालामाऊली आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**सातारा :** येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, पुणे संचलित न्यू इंग्लिश स्कूल सातारा मधील शिक्षक सुधाकर गुरव यांना यंदाचा शालामाऊली आ.ब.कंग्राळकर आदर्श शिक्षक पुरस्कार व गणित विज्ञान शिक्षिका सौ.अश्विनी वैभव कुलकर्णी यांना यंदाचा गोविंद बेडकिहाळ गणित,विज्ञान आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .

सातारा येथील इंग्लिश स्कूलच्या गणेश कलादालनात आयोजित शिक्षक दिनाच्या कार्यक्रमांमध्ये या सत्कार मूर्तींचा सोहळा न्यू इंग्लिश स्कूलचे माजी मुख्याध्यापक व ज्येष्ठ शिक्षण तज्ञ आनंदराव उर्फ अण्णा कंग्राळकर , ज्येष्ठ साहित्यप्रेमी सुहास रानडे व शालेय समितीचे अध्यक्ष अमित कुलकर्णी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह सन्मानपत्र शाल श्रीफळ देऊन करण्यात आला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.एस.ए.महाडिक यांनी केले होते. कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती देवी आणि राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करून झाल्यावर सर्व मान्यवरांचा सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला.त्यानंतर ईशस्तवन व स्वागत गीत सचिन राजोपाध्ये व विद्यार्थी विद्यार्थिनींच्या गायन पथकाने केले .

न्यू इंग्लिश स्कूलच्या शालाप्रमुख सुजाता पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात शाळा माऊलीच्या वतीने शाळेचे माजी मुख्याध्यापक अण्णा कंग्राळकर व माजी शिक्षक गोविंदराव बेडकिहाळ यांनी सर्व शिक्षकांच्या साठी आदर्श शिक्षक पुरस्कार व गणित विज्ञान शिक्षक पुरस्कार सुरू केला .या पुरस्कारामुळे



खरोखरच सर्व शिक्षकांना एक वेगळी ऊर्जा मिळाली असून दरवर्षी या सत्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते .हा एक औचित्यपूर्ण असा कार्यक्रम असून यामुळे खरोखरच शिक्षक बंधू-भगिनींना एक वेगळी ऊर्जा मिळत आहे या कार्यक्रमात अण्णा कंग्राळकर यांच्या हस्ते आदर्श शिक्षक पुरस्कार एनसीसी चे चीफ ऑफिसर सुधाकर दत्तात्रय गुरव यांना प्रदान करण्यात आला ,तर गोविंदराव बेडकीहाळ गणित विज्ञान शिक्षक पुरस्कार शाळेच्या उपशिक्षिका सौ. अश्विनी वैभव कुलकर्णी यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुहास रानडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .सत्कार सोहळ्यात शाळेच्या इयत्ता सातवीतील विद्यार्थ्याने सुधाकर गुरव सरांचे रेखाटलेले चित्र त्यांना प्रदान करण्यात आले तसेच एनसीसी कॅडेट ग्रुपच्या वतीने ही सुधाकर गुरव यांचा विशेष सन्मान करण्यात आला

या सर्व मान्यवरांचा परिचय श्री.कल्याणकर यांनी करून दिला सत्काराला उत्तर देताना सुधाकर गुरव सर म्हणाले की शालामाऊली ने मला दिलेली ही शाबासकीची थाप आणि हा पुरस्कार मी माझे आई-वडील यांना समर्पित करतो आज आदर्श शिक्षक म्हणून माझी केलेली निवड भविष्यातही मी माझ्या कार्यातून निश्चितच दाखवून देणार असून या पुरस्काराने अधिकच ऊर्जा प्राप्त झाली आहे.

आदर्श शिक्षिका अश्विनी कुलकर्णी यांनी या पुरस्कारासाठी माझी निवड केल्याबद्दल मी सर्व शालेय व्यवस्थापन समिती आणि शालामावलीचे विशेष आभार मानते असे सांगून शतकोत्तर आरोप्य महोत्सवी वर्षात हा पुरस्कार मला मिळाला आणि शाळेने जो माझ्यावर विश्वास टाकला तो सार्थ करण्याचा मी सदैव प्रयत्न करेन असे सांगितले उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना शालेय समितीचे अध्यक्ष अमित कुलकर्णी यांनी पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्तींचे अभिनंदन करून शिक्षक दिनाच्या दिवशी आज नवी ऊर्जा मिळण्यासाठी आणि सातत्याने कार्यरत राहण्यासाठी अशा पुरस्कारांची निर्मिती माझी मुख्याध्यापक व शिक्षकांनी केली. आज संपूर्ण भारत देशात गुरुजनांची ओळख ही त्यांचे विद्यार्थी पुढे नेत आहेत. शिक्षकांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठीच हा दिवस असून हा पुरस्कार खरोखरच शिक्षकांना प्रेरणा देणार आहे. मोठ्या पावलावर पाऊल ठेवून छोटी पावले पुढे येण्यासाठी आणि नवीन पिढी घडवण्यासाठी आपण सर्वजण कटिबद्ध आहोत. शिक्षक दिन हा केवळ एका दिवसासाठी नसून संपूर्ण आयुष्यभर शिक्षकी पेशा जपत विद्यार्थी घडवण्याचे काम संपूर्ण शिक्षक वर्ग करत आहे. मान्यवरांच्या आदर्शांची जोपासना व वाटचाल करत आपण नवीन व्यक्तिमत्व घडवाल यात शंका नाही असे सांगितले .

प्रमुख पाहुणे सुहास रानडे यांनी, शिक्षक दिन हा कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असून या पुरस्कारामुळे निश्चितच शिक्षक वर्गाला पाठबळ मिळणार आहे असे सांगून मान्यवरांचे कौतुक केले .कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. कल्याणकर सर यांनी केले. कार्यक्रमास माजी शिक्षक र.मा. पवार , कांबळे यांचे सह पर्यवेक्षक सर, पर्यवेक्षिका ,पालक संघाच्या प्रतिनिधी सौ .ठोंबरे व पालक संघाचे सदस्य तसेच मान्यवर शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.न्यू इंग्लिश स्कूल येथे शिक्षक दिनी आदर्श शिक्षक पुरस्कार सुधाकर गुरव यांना प्रदान करताना अण्णा कंग्राळकर, शेजारी अमित कुलकर्णी,

# व्यापारी वर्गाचा गणेश मिरवणुकांना विरोध नाही

## जिल्हा पोलीस अधीक्षकांना शिष्टमंडळाचे पुन्हा निवेदन

**सातारा :** सातारा शहरातील गणेश मंडळे आणि त्यांच्या निघणाऱ्या मिरवणुका यांना व्यापारी वर्गाचा कोणताही विरोध नाही. समाज माध्यमांवर जे जुने फोटो प्रसारित झाले त्यामुळे काही गैरसमज निर्माण झाले होते. संबंधित फोटो बदलापूर येथे झालेल्या दुर्दैवी घटनेचा निषेध करण्यासाठी निवेदन देतानाचा आहे परंतु गैरसमजातून हा प्रकार झाला आहे त्याबद्दल साताऱ्यातील व्यापारी वर्गाच्या शिष्टमंडळाने दिलगिरी व्यक्त करून याबाबतचे निवेदन पोलीस अधीक्षक समीर शेख यांना सादर केले.

याबाबतची लेखी भूमिका व्यापाऱ्यांनी पत्रकाद्वारे मांडली आहे. पोलीस प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनात नमूद आहे की साताऱ्यातील व्यापारी वर्गाच्या गणेश मिरवणुकीसाठी तसेच आगमन सोहळ्यासाठी पारंपारिक वाद्य अथवा डीजे अशा कोणत्याही गोष्टीला विरोध नाही आणि कधीही राहणार नाही कारण व्यापारी वर्ग देखील गणेश भक्तच आहेत त्यांची देखील सर्वांप्रमाणे गणपतीवर श्रद्धा आहे गेल्या दोन-तीन दिवसापासून सर्वच गणेश भक्तांमध्ये व्यापारी वर्गाबद्दल झालेला गैरसमज दूर करण्याच्या दृष्टीने हा पत्र प्रपंच आहे.

गणेशोत्सव आनंदात साजरा करण्याचे हेतूने प्रस्तुतचे निवेदन आहे.यदाकदाचित व्यापारी वर्गात कोणत्याही गणेश भक्ताच्या भावना दुखावल्या गेल्या असल्यास त्याबद्दल व्यापारी वर्ग दिलगिरी व्यक्त करत आहे या निवेदनावर सुदीप भट्टड, प्रवीण पाटील, प्रवीण राठी, आनंद मालपाणी, दीपक नावंधर ,विजय येवले, पवन लाहोटी, पंकज लाहोटी,ऋषिकेश सारडा, दिनेश नावंदर यांच्या स्वाक्षरी आहेत.

# राजधानी साताऱ्यात बाप्पांचे वाजत गाजत आगमन

**सातारा :** गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया अशा खणखणीत सुरात सातारा जिल्ह्यात गणेश भक्तांनी लाडक्या गणरायाचे जल्लोषात स्वागत केले. ढोल ताशांचा गजर वातावरणात भरलेला अखंड उत्साह आणि घरोघरी बाप्पांच्या आगमनाची आतुरता असे भक्तीमय वातावरण सातारा जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी आढळून आले .यापुढील दहा दिवस हा चैतन्य सोहळा असाच भक्तिमय परंपरेमध्ये सुरू राहणार आहे . पालकमंत्री शंभूराज देसाई, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या घरीही बाप्पांचे थाटात आणि वाजत गाजत आगमन झाले

सातारा शहरामध्ये ठिकठिकाणी गर्दीचा महापूर आढळून आला .बाजारपेठेमध्ये नारळ, हार, फुले, दुर्वा केवडा, कमळ, तसेच पूजेचे साहित्य यांची चढ्या भावाने विक्री झाली .सातारा शहरातील चौकात चौकांमध्ये गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असे चैतन्यमयी सूर ऐकू येत होते .सातारा शहरातील राजवाडा परिसरात फळे फुले,पत्री, विविध प्रकारचे मोदक खरेदीसाठी सातारकरांची झुंबड उडाली होती राजवाडा परिसरातील जनसेवा फ्रुट स्टॉलवर अस्लम बागवान यांनी देश-विदेशातील उत्कृष्ट प्रतीची फळे विक्री उपलब्ध केली आहेत बाप्पाला आवडणाऱ्या माव्याच्या मोदकांसोबत स्ट्रॉबेरी, गुलकंद ,पिस्ता, काजू ,बटरस्कॉच, प्रकारचे साच्यात घातलेले मोदकही विक्रीसाठी उपलब्ध होते शेवंती, गुलाब ,निशिगंध, चाफा ,झेंडू, बेंगलोर गुलाब, आदी प्रकारच्या फुलांना ही मोठी मागणी होती पूजा साहित्यामध्ये केशर, अष्टगंध, हळदकुंकू, जान्हवे, उदबत्ती, अत्तर, निरंजन, वाती



, या खरेदीसाठी मोठी गर्दी झाली

अनेक गणेश भक्तांनी अधून मधून बरसणाऱ्या रिमझिम सरीत आपल्या बाप्पांचे आगमन एक दिवस आधी केले होते . घरातील छोट्या बालकांसमवेत अगदी दुचाकीवरूनही गणपती बाप्पा प्रत्येकाच्या घरी पोहोचत होते .त्याची उत्सुकता सर्वत्र दिसून येत होती गणेश मंडळांच्या सातारा शहरातून देखण्या मिरवणुका काढण्यात आल्या .काही मंडळांनी डॉल्बीला फाटा देऊन ढोल ताशाच्या गजरामध्ये गणरायाचे उत्साहात स्वागत केले .सातारा शहरातील शंकर-पार्वती, सोमवार पेठेतील आझाद गणेशोत्सव मंडळ, मोती चौकातील प्रतापसिंह महाराज मित्र मंडळ, सम्राट गणेश , मंडईचा राजा, या मंडळांनी आपल्या गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना केली सायंकाळी सहा वाजेपर्यंत प्रतिष्ठापना सोहळ्यांचे मंगलमय सूर ऐकू येत होते .दीड दिवसाच्या गणपतीसाठी विसर्जन तलावावर तसेच भवानी तलाव (जलतरण तलाव पालिका) येथे व सातारा शहरात पाच ठिकाणी दगडीकुंडांची सोय करण्यात आलेली आहे याची पालिका मुख्याधिकारी अभिजीत बापट यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत पाहणी केली आहे सातारा नगरपालिकेच्या मानाच्या गणपतीची प्रतिष्ठापना येथील नगरपालिकेच्या जुन्या कार्यालयामध्ये करण्यात आली आहे .

तसेच पुढील तीन दिवसांमध्ये जेष्ठा गौरीचे आगमन होत असून या आगमनाच्या प्रित्यर्थ सुवासिनींनी तिचा फराळ आणि गौरीचे दागिने सजावटीसाठी खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत गर्दी केली होती . सातारा पोलिसांनी पहिल्या दिवशी गर्दीचे नियमन करण्यासाठी ठीक ठिकाणी विशेषता मोती चौक पोवई नाका हुतात्मा चौक राधिका चौक समर्थ मंदिर चौक येथे बंदोबस्त तैनात केला होता . सातारा जिल्ह्याची कमान सांभाळणारे पालकमंत्री शंभूराजे देसाई जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या निवासस्थानी गणरायाचे वाजत गाजत आगमन झाले पालकमंत्री देसाई यांच्या कोयना दौलत या निवासस्थानी पालखीतून बाप्पांची मिरवणूक काढण्यात आली

या पालखीला स्वतः शंभूराजे यांनी खांदा देत बाप्पांचे थाटात आगमन केले . कामाच्या व्यस्त तेतही पोलीस अधीक्षक समीर शेख व जितेंद्र डोळी यांनी बाप्पांची प्रतिष्ठापना करत गणपती बाप्पा मोरया चा गजर केल्या व समस्त सातारकरांना गणपतीच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या पुढील दहा दिवस गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या नेतृत्वाखाली अतिरिक्त पोलीस अधीक्षक आठ उपविभागीय अधिकारी वीस पोलीस निरीक्षक १०३ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक १७०० पोलीस कर्मचारी तसेच साडेसातशे जवानांचा स्ट्रायकिंग फोर्स आणि राज्य राखीव दलाची एक तुकडी बंदोबस्ताच्या दृष्टीने तैनात करण्यात आले आहे या बंदोबस्ताचा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी आढावा घेतला असून पोलिसांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत सातारा स्वराच्या हद्दीतील सातारा शहर व शाहूपुरी तसेच इतर पोलीस चौकींना दोन्ही मापन करण्यासाठी डेसिबल यंत्रणा देण्यात आली असून सर्व गणेशोत्सव मंडळांच्या डॉल्बी चे शास्त्रीय मोजमाप होणार आहे ४५ डिसेबल पेक्षा अधिक ध्वनी यंत्रणा वाजवणाऱ्या मंडळांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिला आहे.

# पाचगणी-महाबळेश्वर राज्य मार्गावर सर्वत्र खड्डेच खड्डे

## वेण्णा लेक जवळ रस्ता घोड्यांचा की वाहनांचा अशीच परिस्थिती

**मेढा :** महाबळेश्वर पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या पाचगणी ते महाबळेश्वर राज्य मार्गावर सर्वत्र खड्डेच खड्डे पडल्याने खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वेण्णा लेक जवळ तर हा रस्ता वाहनांचा की घोड्यांचा अशी परिस्थिती पाहायला मिळत आहे.याठिकाणी मोठमोठे खड्डे पडून तळे साचले आहे. त्यामुळे वाहन चालकांना महाबळेश्वर शहरात प्रवेश करताच मोठी कसरत करावी लागत आहे. तात्काळ हे खड्डे भरण्यात यावेत अशी मागणी वाहनचालकांमधून होत आहे.



महाबळेश्वरचा पाऊस,धुके व पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी हजारो पर्यटक महाबळेश्वर मध्ये येत आहेत. या पर्यटकांकडून कर स्वरूपात एन्ट्री तिकीट नगरपरिषदेकडून घेतली जाते. मात्र त्या प्रमाणात सुविधा नगरपरिषेकडून पुरवल्या जात नाहीत. पाचगणी ते महाबळेश्वर या राज्य मार्गावर अनेक ठिकाणी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे त्यामुळे वाहनचालक या मार्गावरून प्रवास करताना त्रस्त होताना दिसून येत आहेत.वेण्णा लेक जवळ तर खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याने महाबळेश्वर शहरात प्रवेश करताच वाहन चालकांना या खड्ड्यांचा अनुभव येत आहे. त्यामुळे अनेक वाहनांचे नुकसान देखील होत आहे.

बांधकाम विभाग याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत असून बांधकाम विभागाने हे खड्डे कायमस्वरूपी तात्काळ भरावेत अशी मागणी वाहन चालकांमधून होत आहे.

# श्रीगणेशाच्या आगमानलाच मेढा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**मेढा :** श्री गणेशाच्या आगमनालाच मेढा पोलीस सतर्क झाले असून मेढा पोलिसांनी धडाकेबाज कारवाया सुरू केल्या आहेत .विनापरवाना डॉल्बी वाजवण्यास मनाई असताना डॉल्बी वाजवणाऱ्या तीन डॉल्बी चालकांवर मेढा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे .तर विनापरवाना डॉल्बी वाजवाल तर कारवाई सामोरे जावे लागेल ,असा इशारा मेढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पृथ्वीराज ताटे यांनी डॉल्बी चालकांना आहे .

याबाबत सविस्तर माहिती अशी की शुक्रवारी सहा सप्टेंबर रोजी मेढा पोलीस ठाणे हद्दीमध्ये मौजे कुडाळ तालुका जावली गावच्या येथे सार्वजनिक




रोडवर कर्णकश वाद्य / डॉल्बी वाजवण्यास मनाई असताना १) ए.पी.आऊटलाईन साऊंड सिस्टीम चे मालक अभिषेक रविंद्र चव्हाण रा.मु.पो. म्हसवे ता. जावली जि. सातारा यांनी संत सावता माळी मंडळ कुडाळ ता. जावली, २) पावरप्लस साऊंड सिस्टीम चे मालक शुभम शहाजी बाकले रा.मु. पो. जुळेवाडी ता. कराड जि.सातारा यांनी नवज्योत मित्र मंडळ कुडाळ ता. जावली तसेच ३) एस.आर.एस. साऊंड सिस्टीम चे मालक कृष्णा पोपट मोरे रा.मु.पो. गोडोली ता.जि. सातारा यांनी पिंपळेश्वर मित्र मंडळ कुडाळ या मंडळाचे समोरील रोडवर आपल्या ताब्यातील डॉल्बी / वाद्य ,कर्कश आवाजामध्ये वाजून विनाकारण रस्त्यावर रेंगाळत ठेवून आसपास राहणाऱ्या लोकांना अडथळा होईल अशा परिस्थितीत वाद्य/ डॉल्बी वाजवीत असल्याने सदर डॉल्बी मालक याच्यावर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ ई अन्वये कारवाई केली. तरी सर्व गणेश मंडळांनामेढा पोलिसांनी आवाहन केले आहे की मिरवणुकी दरम्यान पारंपारिक वाद्याचाच वापर करावा अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेलं.





साताऱ्यात फुलांचे भाव गेले गगनाला (फोटो.. अतुल देशपांडे, सातारा)

# अमित शहा यांची मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना सूचना

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे निवडणूक रणनीतीकार अमित शहा यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना महायुतीतील बोलघेवड्या नेत्यांना आवर घालण्याची सूचना केली. महायुती म्हणून सर्व घटक पक्ष एकत्र असल्याचा संदेश मतदारांपर्यंत जाण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

शहा हे दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर असून रविवारी रात्री त्यांनी मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि पवार यांच्याशी निवडणुकी संदर्भात खलबते केली. मागील काही काळापासून महायुतीच्या घटक पक्षातील नेत्यांकडून काही वादग्रस्त विधाने केली गेली आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशी विधाने केली जाऊ नयेत आणि घटक पक्षातील नेत्यांनी एकमेकांच्या उखाळ्या पाखळ्या काढून मतभेद जाहीर करू नयेत, याची काळजी घेण्याच्या सूचना शहा यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना दिल्या. विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांबद्दल पसरविल्या जाणाऱ्या संभाव्य कथितांना (नरेटीव्ह) सडेतोड प्रत्युत्तर द्या, असेही त्यांनी सांगितले.

निवडणूक प्रचारादरम्यान राज्य सरकारने जाहीर केलेल्या आणि अमलात आणलेल्या विविध कल्याणकारी यांनी, निर्णय आणि धोरणे अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, अशी अपेक्षा ही शहा यांनी व्यक्त केली.

भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या अंतर्गत सर्वेक्षणाच्या अहवालावरही या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. विद्यमान आमदारांपैकी काही आमदारांचे काम समाधानकारक नसल्याकडे शहा यांनी लक्ष वेधले. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी देताना निवडून येण्याची क्षमता काटेकोरपणे तपासली जावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# तब्बल ५ लाख रूपयांची बक्षिसे असलेल्या झिम्मा-फुगडी स्पर्धेचे २५ सप्टेंबरला आयोजन



**कोल्हापूर :** धनंजय महाडिक युवाशक्ती महिला आघाडी प्रेरित भागीरथी महिला संस्थेच्यावतीने दरवर्षी पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठया झिम्मा फुगडी स्पर्धेचे आयोजन केले जाते. यंदा १५ व्या वर्षी बुधवार दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी, मार्केट यार्डमधील रामकृष्ण मल्टीपर्पज लॉन येथे झिम्मा - फुगडीसह महिलांच्या पारंपारिक खेळांच्या स्पर्धा रंगणार आहेत. या स्पर्धे साठी तब्बल ५ लाख रुपयांची आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच स्पर्धेमध्ये युवतींचा सहभाग वाढावा आणि युवतींनाही स्पर्धेत आपल्या कलागुणांचे प्रदर्शन घडवता यावे, याकरता १२ ते १८ वयोगटातील युवतींसाठी ५० हजार रुपये बक्षिसांची वेगळी सांघिक झिम्मा स्पर्धा घेतली जाणार आहे, अशी माहिती भागीरथी महिला संस्थेच्या अध्यक्षा सौ. अरुंधती महाडिक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्पर्धेत झिम्मा, घागर घुमविणे, उखाणे, सूप नाचविणे, काटवट काणा, छुई फुई, जात्यावरील ओव्या, फुगडी, घोडा घोडा आणि पारंपारिक वेशभूषा अशा गटांमध्ये ही स्पर्धा होत असून, या स्पर्धेसाठी पहिल्या क्रमांकाच्या संघाला २५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह, दुसर्या क्रमांकासाठी २० हजार रुपये आणि सन्मानचिन्ह, तिसर्या क्रमांकासाठी १५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह, तर चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या क्रमांकासाठी ५ हजार एक रुपये आणि सन्मानचिन्ह तसंच ५०१ रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंतची वैयक्तिक बक्षिसे दिली जाणार आहेत. तसंच १२ ते १८ वयोगटातील मुलींसाठी खास ५० हजार रुपये बक्षिसांचा वेगळा सांघिक झिम्माही आयोजित करण्यात आला आहे. सहभागी सर्व महिलांसाठी चहा, नाष्टा आणि जेवणाची सोय करण्यात आली असल्याचे असे अरुंधती महाडिक यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला वैष्णवी महाडिक,. मंजिरी महाडिक उपस्थित होत्या.

# मोरयाच्या जयघोषात तासगावचा रथोत्सव

## लाखो भाविकांची उपस्थिती ; गुलाल खोबऱ्याची उधळण




**तासगाव :** गणपती बाप्पा मोरया! मोरया ! मोरया... च्या जयघोषात तासगावच्या सिद्धिविनायकाचा २४५ वा रथोत्सव लाखो भाविकांच्या उपस्थितीत पार पडला. लाखो भाविकांचा अलोट उत्साह पाहायला मिळाला. रथयात्रा तब्बल तीन साडेतीन तास सुरू होती. तासगावच्या पटवर्धन संस्थानच्या श्री गणपती पंचायतन श्री सिद्धिविनायकाचा हा २४५ वा रथोत्सव आज उत्साहात साजरा झाला. मराठा साम्राज्याचे शेवटचे सरसेनापती परशुरामभाऊ पटवर्धन सुरू केलेल्या या रथयात्रेला राज्यभरातून गणेश भक्त उपस्थिती लावतात. तीन मजली लाकडी कोरीव काम केलेल्या रथातून श्री सिद्धिविनायक आपल्या वडिलांना भेटण्यासाठी श्री काशीविश्वेश्वर मंदिरात जातात, अशी आख्यायिका आहे. लोखंडी चाके असलेला हा रथ हजारो भाविक दोरखंडाच्या सहाय्याने हाताने ओढत नेत असतात.

आज दीड वाजता श्रींची पंचधातूची उत्सवमूर्ती रथात आणण्यात आली. गणपतींची आरती आणि राष्ट्रगीत झाल्यानंतर रथ ओढणारे हजारो युवक प्रसादाची मागणी करत होते. रथातून नारळाचे खोबरे, पेढे आणि गुलाल यांची प्रसाद म्हणून उधळण करण्यात येत होती. पुढे सरकत रथ साडे तीन वाजता श्री काशीविश्वेश्वर मंदिर पर्यत पोहोचला. तेथे श्रींची आरती होवून रथ परत मंदिराकडे माघारी आणण्यात आला. रथयात्रा साडे चार तास सुरू होती. पटवर्धन संस्थानिक राजेंद्र पटवर्धन, डॉ. आदिती पटवर्धन यांनी रथाचे सारथ्य केले. रथामधे मंदिराच्या विश्वस्तासह मानकरी बसलेले होते.गतवर्षी प्रमाणे यंदाही रथयात्रेच्या सुरुवातीला झालेल्या वादामुळे रथयात्रा उशिरा सुरू झाली.

रथायात्रेसाठी राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री ना. शंभुराजे देसाई, खा.विशाल पाटील, माजी खा. संजय पाटील,पृथ्वीराज पाटील,रोहित पाटील, प्रभाकर पाटील हे उपस्थीत होते. संस्थानिक राजेंद्र पटवर्धन, डॉ. आदिती पटवर्धन यांनी रथाचे सारथ्य केले. सायंकाळी राजवाड्यात रथाचे मानकरी यांना मानाचे नारळ देऊन रथयात्रा पर पडली.

तासगावच्या गणपती रथोत्सवासाठी आज वरुण राजाने ही उपस्थिती लावली. दुपारी रथयात्रा सुरू झाल्यानंतर तासगाव मध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली. गुलाल खोबऱ्याची उधळण व अवकाशातून होणारा मुसळधार पाऊस याने भाविकांचा उत्साह आणखीनच द्विगुणीत झाल्याचे पाहायला मिळाले. भर पावसात रथोत्सवाचा आनंद सर्वांनी लुटला.

# श्रीक्षेत्र ओझर येथे गणपती बाप्पांचा जन्म सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा

## फुलांची उधळण करत देव जन्म सोहळा उत्साहात



**नारायणगाव :** श्रीक्षेत्र ओझर येथे विघ्नहर्ता बाप्पांचा चौथा द्वार आंबेराई ओझर नवीन गावठाण येथे मार्गस्थ होऊन पालखी मंदिरात आल्यानंतर , बरोबर १२ वाजून ३०मिनिटांनी फुलांची उधळण होत, मोरया गोसावी यांची पदे गाऊन अतिशय मंगलमय वातावरणात देव जन्म सोहळा उत्साहात पार पडला. या द्वार यात्रेत बाप्पांच्या पालखीवर जे.सी.पी.द्वारे फुलांची उधळण करण्यात आली. देव जन्म सोहळ्याप्रसंगी ह. भ. प. माऊली महाराज कुसुरकर यांचे गणेश जन्माचे सुश्राव्य किर्तन झाले.

या देव जन्म सोहळ्यासाठी आमदार अतुल बेनके, सत्यशील शेरकर , मोहित ढमाले, शिवसेना तालुका प्रमुख माऊली खंडागळे आदी अनेक धार्मिक, अध्यात्मिक, सामाजिक, राजकीय व्यक्ती उपस्थित होते. यावेळी भाविकांनी देवदर्शनासाठी लांबच लांब रांगा लावल्या होत्या . येणाऱ्या सर्व गणेश भक्तांसाठी माजी विद्यार्थी संघटना ओझर यांस कडून पाच दिवस अन्न भोजनाची विशेष व्यवस्था भोजन कक्षात करण्यात आली होती.

# वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघ



**पुणे :** वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते बापू पठारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात घरवापसी करणार असून तुतारीच्या चिन्हावर विधानसभा निवडणूक ही लढवणार आहेत. पठारे यांच्या घरवापसीमुळे भाजपला मोठा धक्का बसणार आहे.

पठारे कुटुंब हे वडगाव शेरीच्या राजकारणातील मोठे प्रस्थ आहे. वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात सुनील टिंगरे हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत हा मतदारसंघ अजित पवार गटाकडे जाणार ही बाब निश्चित असून टिंगरे यांना पुन्हा उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे.

त्यामुळे अर्थातच बापू पठारे यांना ही निवडणूक लढवता येणार नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्याचे निश्चित केले असून तसे त्यांनी मतदारसंघातील एका गणेशोत्सव मंडळाच्या कार्यक्रमात बोलताना स्पष्ट केले. या पक्षाकडून आपण विधानसभा निवडणूक लढविणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली आहे.

# नुकसान भरपाई न मिळाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा; राजू शेट्टी



**कोल्हापूर :** गेल्या आठवड्यात झालेल्या परभणी जिल्ह्यातील अतिवृष्टीने सोयाबीन , कापूस , उडीद , तूर व मक्का पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. आठ दिवस झाले तरीही शासनाने अजूनही सानुग्रह अनुदान दिले नाही , पडझडीचे पंचनामे सुरू केलेले नाही. येत्या आठ दिवसात सदरचे अनुदान खात्यावर जमा न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर पुरग्रस्तांना घेऊन मोर्चा काढणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली.

आज मा. खा. छत्रपती संभाजीराजे , मा. खा. राजू शेट्टी ,आमदार बच्चू कडू यांच्यासह शेतकरी नेत्यांनी मानवत तालुक्यातील वाझूर , सावली या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.अतिवृष्टीने शेतकरी हतबल झालेला असून शासनाने नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्याची गरज आहे. यावेळी बोलताना छत्रपती संभाजीराजे म्हणाले कि ,पुरग्रस्त भागातील अनेक कुटूंबे उघड्यावर पडलेली आहेत. जमीनी खरडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. शासनाकडून पुरग्रस्तांना वा-यावर सोडण्यात आले असून जवळपास आठ ते दहा दिवस झाले तरीही लोकांना सानुग्रह अनुदान देण्यात आले नाही.

आमदार बच्चू कडू बोलताना म्हणाले कि सरकारने यामध्ये गांभीर्याने लक्ष घालून पिकविमा कंपन्यांना तातडीने संरक्षित रक्कम शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत आदेश देणे गरजेचे असून ज्या शेतक-यांनी पिकविमा उतरविला नाही त्यांना २०१९ च्या धर्तीवर मदत करण्याची मागणी करण्यात आली.

# हजारो महिलांच्या उपस्थितीत अथर्वशीर्ष पठण व महाआरती

## श्री गणेशोत्श्री गणेशोत्सव मंडळ, वाजगे आळीचा उपक्रम



**नारायणगाव :** नारायणगाव येथील श्री गणेशोत्सव मंडळ वाजगे आळी , हर्षलभाऊ वाजगे मित्र परिवार व विक्रांत क्रीडा मंडळाच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त सार्वजनिक अथर्वशीर्ष पठण व महाआरती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजारो महिला भगिनी या सोहळ्यात सहभागी झाल्या होत्या.

या कार्यक्रम प्रसंगी माजी आमदार स्वर्गीय वल्लभ बेनके यांच्या पत्नी राजश्री बेनके, आमदार अतुल बेनके यांच्या पत्नी गौरी बेनके, माजी जिल्हा परिषद सदस्या राजश्री बोरकर, अंजली खैरे, सुरेखा वाजगे, युवा नेते सुजित खैरे, शितल ठुसे, रत्नप्रभा तांबे, विमल थोरात, सुनंदा वाजगे, स्मिता वाजगे, माजी उपसरपंच संतोष वाजगे, विविध कार्यकारी सोसायटीचे उपाध्यक्ष किरण वाजगे, संजय वाजगे, श्रीकांत पाटील, जितेंद्र वाजगे, राजेश वाजगे, अजित वाजगे, विकास बाळसराफ, तेजस वाजगे, निलेश रसाळ, निलेश गोरडे, नवनाथ एरंडे, भूषण शिवले, मोहक वाजगे, अजिंक्य दळवी, चेतन फल्ले व हर्षल वाजगे मित्र परिवाराचे व विक्रांत क्रीडा मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

मंडळाच्या वतीने यावर्षी गणेश उत्सवानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर तसेच विसर्जन मिरवणुकीमध्ये आकर्षक पारंपरिक ढोल ताशा झांज पथक व आकर्षक देखावा सादर केला जाणार आहे.

कार्यक्रमामध्ये अथर्वशीर्ष पठण व मंत्र पठण प्रवीण आचार्य यांनी केले. सूत्रसंचालन मास्टर अलंकार यांनी केले तर आभार हर्षल वाजगे यांनी मानले.

# आद्य क्रांतीवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी



**नारायणगाव :** भारताच्या स्वातंत्र्याकरीता प्रथम सशस्त्र क्रांतीचे स्वप्न पाहणारे आद्य क्रांतिवीर उमाजी राजे नाईक यांची जयंती आज पारगाव मंगरूळ ( तालुका जुन्नर) येथील ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी पारगाव चे माजी सरपंच संभाजी चव्हाण, माजी उपसरपंच रामदास तट्टू, गोफणे सर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन प्रसंगी आद्य क्रांतिवीर उमाजी नाईक महिला संघटनेचे जिल्हाध्यक्ष सरिता चव्हाण, सरपंच रेश्मा बोरकर, जय मल्हार क्रांती संघटना तालुका अध्यक्ष गोफणे सर, दिलीप पाटील, निलेश चव्हाण.आदित्य चव्हाण, ओंकार चव्हाण, दिपक चव्हाण, राहुल गफले, मनिषा जाधव, अर्चना डुकरे, गणेश चव्हाण, रमेश गफले, नितीन जाधव, चंद्रकांत बोडरे.राजु चव्हाण,काळुराम चव्हाण.दिलीप भंडलकर,पांडुरंग चव्हाण, विशाल चव्हाण, तुषार चव्हाण, दिपाली चव्हाण, मिराबाई वाळुंज, कृष्णा चव्हाण, विकास बोटकर, जय मल्हार क्रांती संघटना व जय राजे उमाजी नाईक संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# सातारा कृषी विभागात बर्फी वाटून साजरा केला मुलीचा जन्मोत्सव

**सातारा :** मुलगी म्हणजे लक्ष्मी सरस्वती व दुर्गा असे पूर्वी सांगितले जात होतं .अलीकडच्या काळामध्ये माता जिजाऊ, माता रमाई ,माता सावित्री असा गौरव केला जातो. आज खऱ्या अर्थाने जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी कार्यालय कृषी विभाग, सातारा या ठिकाणी कृषी विभागाच्या एका कर्मचाऱ्यांनी चक्क बर्फी वाटून मुलीचा जन्मोत्सव साजरा केला. यावेळी सर्वांनी नूतन बाळाला आशीर्वाद दिले.

याबाबत माहिती अशी की ,सातारा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय कृषी विभाग सातारा येथील कर्मचारी अजय राजे यांना कन्येरत्नचा लाभ झाल्यामुळे त्यांनी आनंद उत्सवाने साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आज त्यांनी कृषी विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना चक्क बर्फी आणून वाटली. सातारा जिल्ह्यात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यशानी नागराजन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सौ.भाग्यश्री फरांदे- पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, तहसीलदार बाई माने, ढवळे कार्यरत आहेत. त्याचबरोबर अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून पूर्वी आँचल दलाल होत्या. आता त्यांच्या जागी कर्तबगार महिला पोलिस अधिकारी वैशाली कडुकर यांची बदली झालेली आहे.

तसं पाहिलं तर सातारा जिल्ह्याचा जर विचार केला तर जिल्हा माहिती अधिकारी सौ वर्षा पाटोळे, उपविभागीय अधिकारी अश्विनी शेडगे, मुख्य वनक्षेत्रपाल आदिती भारद्वाज, शिक्षण अधिकारी (माध्यमिक) प्रभावती कोळेकर. (प्राथमिक) शबनम मुजावर, महिला बालकल्याण अधिकारी सौ. रोहिणी ढवळे, पत्रकारिता क्षेत्रातील प्रगती जाधव- पाटील, गौरी आवळे अशा विविध ठिकाणी कर्तबगार महिला काम करत आहेत. त्यांच्याच आदर्श घेऊन या नूतन बालिकेने ही भरारी मारावी.

अशा अनेकांनी शुभेच्छा दिल्या आहेत .खरं म्हणजे बर्फीचा गोडवा आणि चेहऱ्यावरील आनंद खरं म्हणजे स्त्री- पुरुष समतेचाच धडा देत होते. याचा मनस्वी आनंद सर्वांनाच झालेला आहे. सातारा जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयात एक डझनभर महिला वर्ग सक्षमरित्या काम करून कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांचाही विकास कामांमध्ये खारीच वाटा उचलत आहे. त्यांच्या ही गौरव होत आहे.

# संविधान युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांवरील दाखल गुन्हे मागं घेण्याची मागणी



कोल्हापूर - दबावाला बळी पडून संविधान युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांवर दाखल करण्यात आले आहेत ते गुन्हे मागं घ्यावेत, अशी मागणी आंबेडकरी समाज पक्ष संघटना जन आंदोलनाच्यावतीनं करण्यात आलीय. या मागणीचं निवेदन त्यांनी जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक तानाजी सावंत यांना दिले

ऐतिहासिक बिंदू चौकाचं सुशोभीकरण करण्यात यावं आणि या ठिकाणचं विद्रूपीकरण थांबवण्यात यावं, अशी मागणी संविधान युवा प्रतिष्ठानच्यावतीनं गेल्या काही वर्षांपासून केली जात होती. प्रतिष्ठानच्या मागणीच्या पाठपुराव्यानंतर महानगरपालिकेनं २०१३ मध्ये ऐतिहासिक बिंदू चौकात राजकीय आणि धार्मिक कार्यक्रमांना बंदी घालण्याचा ठराव केला होता. मात्र या ठरावाची अंमलबजावणी होत नाहीय. या पार्श्वभूमीवर संविधान युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी बिंदू चौकात धार्मिक आणि राजकीय कार्यक्रम आयोजन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी महापालिकेसमोर आंदोलन केलं होतं. मात्र आंदोलन करणाऱ्या संविधान युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांवर महापालिकेच्या मागणीनुसार पोलीस प्रशासनानं गुन्हे दाखल केले. हे गुन्हे तात्काळ मागं घ्यावेत यासाठी आज आंबेडकरी समाज पक्ष संघटना जन आंदोलनच्या शिष्टमंडळानं जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक तानाजी सावंत यांची भेट घेतली आणि त्यांना मागणीचं निवेदन दिलं.

यावेळी प्राध्यापक शहाजी कांबळे, अशोक कांबळे, नंदकुमार गोंधळी, रूपाताई वायदंडे, पांडुरंग कांबळे , विश्वासराव तरटे, विद्याधर कांबळे, बंडू भामटेकर, सुरेश सावर्डेकर आणि सोमनाथ घोडेराव उपस्थित होते.

# सराईत गंठन चोरांना अटक

**दौंड :** मोटार सायकल वरुन येवुन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसका मारुन चोरनारया दोन सराईत चोरांना दौंड पोलिसांनी शिताफीने अटक कैलयाची महिती यवतचे पोलिसानी केल्याची माहिती पो. नि. नारायण देशमूख यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, राहू येथुन यवत येथै एका लग्न समारंभास येणारया महीलेचे गळ्यातील सोन्याचे गंठण किंमत एक लाख सत्तावन हजार पाचशे रुपये मोटार सायकल वरुन आलेल्या दोन अनोळखी चोरांनी चोरुन नेले होते. हि घटना १५/८/२०२४ रोजी घडलेली होती.